**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**- 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
GRAM : UNISHIVAJI TELEX : 0195 559 SUK IN
PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

**Dr. B. M. Hirdekar**
Controller of
Examinations

Ref. No. : SU/ ON Exam./Dy.R / coe/335 Date :- 5th April, 2013

प्रति,

प्राचार्य/संचालक,
संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था

विषय :- प्रथम वर्ष सत्र-१ व सत्र-२ रिपीटर/फ्रेश व दूरशिक्षण अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासणी महाविद्यालयात करण्याबाबत...

संदर्भ :- जा.क्र. एसयु/परीक्षा/३४/दिनांक १ एप्रिल २०१३ व
जा.क्र. एसयु/परीक्षा/गोपनीय/बी.कॉम/५७८६/दिनांक २९.३.२०१३

महोदय,

वरील विषयासंदर्भात आदेशान्वये कळविण्यात येते की, वरील दोन संदर्भांकित पत्रानुसार उत्तरपत्रिका मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावर पोहोच करण्याबाबतचा तपशील कळविण्यात आला आहे. सदर पत्रामध्ये प्रथम वर्ष सत्र-१ रिपीटर असा उल्लेख आलेला आहे. तथापि अधिकारमंडळाच्या यापूर्वीच्या मान्यतेनुसार प्रथम वर्षाच्या परीक्षेचे संपूर्ण कामकाज महाविद्यालयांकडे सोपविण्यात आले असल्याने यापूर्वीच्या SU/On Exam/Dy.R/3353 dated 23th October 2012 and SU/Onl Exam/Dy.R/3522A dated 2nd November, 2012 पत्रानुसार कळविण्यात आलेल्या पध्दतीनेच ***प्रथम वर्षाच्या (दोन्ही सत्रांच्या फ्रेश व रिपिटर आणि दूरशिक्षण अभ्यासक्रमांच्याही) उत्तरपत्रिका तपासणीचे कामकाज महाविद्यालयातच पूर्ण करावयाचे आहे.*** त्यासाठी खाली दिलेल्या सूचनांप्रमाणे उत्तरपत्रिका तपासणीचे कामकाज करवून घ्यावे:

१) बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी.(सर्व शाखा), बी.बी.ए., बी.सी.ए., बी.सी.एस., बी.ए.बी.एड., बी.डेस., बी.एफ.टी.एम., बी.डी.एफ.सी., बी.आय.डी बी.एस.डब्ल्यू. या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या दोन्ही सत्रांच्या परीक्षांना खालील प्रमाणे विद्यार्थी बसणार आहेत.

१. भाग-१ सेमिस्टर १ चे महाविद्यालयांचे नियमित फ्रेश विद्यार्थी.
२. भाग-१ सेमिस्टर १ चे ऑक्टोबर १२ मध्ये परीक्षेस बसू न शकलेले परंतु मार्च १३ मध्ये दोन्ही सेमेस्टरची परीक्षा देणारे फ्रेश विद्यार्थी
३. भाग-१ सेमिस्टर १ व २ चे महाविद्यालयाचे नियमित परंतु रिपीटर विद्यार्थी.
४. भाग-१ सेमिस्टर १ व २ चे दूरशिक्षण अंतर्गत प्रवेश घेतलेले रिपीटर विद्यार्थी.

***यापूर्वीच्या परिपत्रकान्वये जे विषय आपल्या महाविद्यालयात शिकविले जात नाहीत अशा विषयांच्या दूरशिक्षण अभ्यासक्रमाचे नियमित व रिपिटर आणि महाविद्यालयाच्या रिपिटर विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका आपल्या नजीकच्या महाविद्यालयातील संबंधीत विषयाच्या प्राध्यापकांकडून असे पेपर तपासून घेण्यात यावेत. दूरशिक्षण अभ्यासक्रमाचे नियमित व रिपिटर आणि महाविद्यालयाचे ऑक्टोबर २०१२ व तत्पूर्वीचे रिपिटर विद्यार्थी यांच्या उत्तरपत्रिका तपासणीचे मानधन आपल्या महाविद्यालयास देण्यात आलेल्या ॲडव्हान्स रक्कमेतून देण्यात यावे.***

वरील पैकी अ. क्र. २ ते ४ नुसार आपल्या महाविद्यालयात परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासून त्याची को-या मार्कलिस्ट http://suk.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावरील डाऊनलोड या मेनुमधून प्रिंट काढून ते विद्यापीठाकडे त्या त्या परीक्षा विभागात पाठवावीत. तसेच सदर उत्तरपत्रिकांचे गठ्ठे हे उपरोक्त अ. क्र. १ ते ४ नुसार स्वतंत्रपणे ठेवावेत. विद्यापीठाकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतची कार्यवाही करावी.

१. महाविद्यालयांनी कोणत्याही परीक्षेसाठी परस्पर ऑड नंबर देण्याचे नाहीत. ऑड नंबरसाठी संबंधित परीक्षा विभागाकडे दूरध्वनी संपर्क करून त्यांचेकडे संबंधित विद्यार्थ्याचा तपशील नोंद करून ऑड नंबर मागवून घ्यावा व त्याबाबतचा तपशील सोबत दर्शविलेल्या नमुन्यात उपकुलसचिव, सौ. ए.ए. महाडेश्वर, डियुडिसी प्रोजेक्ट समन्वयक यांचेकडे न विसरता पाठवावा अन्यथा अशा विद्यार्थ्यांचे निकाल तयार करताना अडचणी येतील, त्याची जबाबदारी महाविद्यालयांची राहील.

२. प्रथम वर्षाच्या प्रथम व द्वितीय सत्राच्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी परीक्षा संपताच तांतडीने करून त्यांचे गुण आपापल्या महाविद्यालयास देण्यात आलेल्या http://suk.digitaluniversity.ac या पोर्टलवरून आपणास दिलेला युजर आयडी व पासवर्ड वापरून डाटा एन्ट्रीने एक्सपोर्ट करावेत. एक्सपोर्ट केल्यानंतर तयार झालेली झीप फाईल सीडीवर सेव्ह करावी व ती सीडी विद्यापीठात परीक्षा भवन १ मध्ये रूम नंबर २०१ येथे पाठवावी.

३. *उत्तरपत्रिका तपासणीचे कामकाज त्या त्या परीक्षेचा शेवटचा पेपर संपल्यापासून १० दिवसात उत्तरपत्रिका तपासणी व पुढील ५ दिवस डाटा एन्ट्रीसाठी अशा पध्दतीने संपवावे. मानधनाचे दर यापूर्वी कळविण्यात आलेले आहेत. ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कापैकी २५ टक्के रक्कम विद्यापीठात भरणा केलेली आहे त्यांच्या उत्तरपत्रिका तपासणीचे मानधन महाविद्यालयांच्या ७५ टक्के रक्कमेतून विद्यापीठ नियमानुसार आदा करावे.*

Dr. B. M. Hirdekar
Controller of
Examinations

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
✉ GRAM : UNISHIVAJI TELEX : 0195 559 SUK IN
☎ PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/ ON Exam./Dy.R / coe/335 Date :- 5th April, 2013



४. द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे व रिपिटर विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षेचे गुण पाठविण्यासाठी विद्यापीठाच्या http://online.shivajiuniversity.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरी अंतर्गत परीक्षांचे गुण तांतडीने भरून त्याची प्रत विद्यापीठात पाठवावेत.

५. मार्च/एप्रिल २०१३ मध्ये होणा-या प्रथम वर्षाच्या सत्र-१ व सत्र-२ च्या फ्रेश/रिपिटर तसेच दूरशिक्षण अभ्यासक्रमांतर्गत बी.ए. /बी.कॉम परीक्षा यांच्या उत्तरपत्रिका आपापल्या/संबंधित महाविद्यालयांमध्ये पूर्वीप्रमाणेच दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे तपासून घ्यावयाच्या आहेत. तसेच त्यांची मार्कलिस्ट स्वतंत्रपणे संबंधित परीक्षा विभागाकडे पाठविण्याची आहेत.

६. दूरशिक्षण व ज्या विद्यार्थ्यांचे १०० टक्के परीक्षा शुल्क विद्यापीठात भरणा केलेले आहे अशा विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासणीचे देयक विद्यापीठाने अन्य परीक्षांसाठी पाठविलेल्या ॲडव्हान्स रक्कमेतून नियमानुसार आदा करावे.

७. कांही महाविद्यालयांनी मार्च-१३ परीक्षेसाठी त्यांच्या प्रथम सत्राच्या रिपिटर विद्यार्थ्यांचे १०० टक्के परीक्षा शुल्क विद्यापीठात भरणा केले आहे, त्यांनी त्यांच्या पावत्यांची प्रत विद्यापीठ जमा करून खात्री करावी. त्यानंतर ७५ टक्के रक्कम मागणीचे पत्र विद्यापीठाकडे पाठवावे म्हणजे त्यांचा ७५ टक्के हिस्सा परत करणे शक्य होईल.

प्रथम वर्ष सत्र-१ व सत्र-२ रिपीटर/फ्रेश व दूरशिक्षण अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांशिवाय अन्य सर्व सत्रांच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी संदर्भित पत्रान्वये कळविलेल्या मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रांकडे त्या त्या लॉटप्रमाणे पाठवाव्यात.

कळावे,

आपला विश्वासू,

( डॉ. बी. एम. हिर्डेकर )
परीक्षा नियंत्रक

सोबत : ऑड नंबर माहितीचा नमुना

प्रत:-

१. सर्व परीक्षा विभागप्रमुख,
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग
३. मध्यवर्ती मूल्यमापन विभाग
४. सर्व मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रे
५. नियुक्ती विभाग
६. लेखा विभागास माहितीसाठी
७. संगणक केद्रास माहितीसाठी

### ऑड नंबरची माहिती पाठविण्याबाबतचा नमुना

| महाविद्यालयाचे नांव | विद्यार्थ्यांचे नांव | पीआरएननंबर | परीक्षा | शुल्क भरणा केल्याचा रिसिट नंबर व तारीख | पूर्वी परीक्षेस बसलेला तपशील | परीक्षा अर्ज परीक्षा विभागात पाठविल्याची तारीख | दिलेला ऑड नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

सही व शिक्का
प्राचार्य